(1)

# FIRST INFORMATION REPORT

**Form : 1-A**

पहिली खबर

(Under Section 154 Cr. P.C.)

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ प्रमाणे)

No. 0000553

1. *Dist. जिल्हा भंडारा *P.S. पोलीस ठाणे तुमसर *Year वर्ष २०१९ *FIR No. पहिली खबर क्र. ४४५ *Date तारीख 08/09/२०१९

2. (i) *Act अधिनियम ला.प्र.का. १९८८ (सुधारित अधिनियम २०१८) *Sections कलमे ७

(ii) *Act अधिनियम — *Sections कलमे —

(iii) *Act अधिनियम — *Sections कलमे —

(iv) *Other Acts & Sections इतर अधिनियम व कलमे —

3.(a) *Occurence of Offence : अपराधाची घटना *Day वार बुधवार *Date from तारीख पासून 08/09/२०१९ *Date To तारीख पर्यंत 08/09/२०१९

*Time Period वेळेचा अवधी दुपारी *Time From पासून १२:४० *Time To पर्यंत —

(b) Information received at P.S.Date पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख 08/09/२०१९ *Time वेळ २०:४८

(c) General Diary Reference Entry No. (s) सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्रमांक ६४/२०१९ *Time वेळ २०:४८

4. Type of information : माहितीचा प्रकार लाच व भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्याने *Written / Oral : लेखी/तोंडी लेखी

5. Place of Occurrence : घटनेचे ठिकाण (a) * Direction and Distance from P.S. पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर २.२ किमी पश्चिम Beat No. गस्तखोड क्र.

(b) *Address: पत्ता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कार्यालय, पंचायत समीती तुमसर येथील कक्षासमोर

(c) *In case outside limit of this Police Station, then the या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव

Name of P.S. पोलीस ठाणे — Dist.: जिल्हा —

6. Complainant /Informant : तक्रारदार / खबरी

(a) Name नाव संदीप ध्यानीराम पडारे,

(b) Father's/ Husband's Name पित्याचे / पतीचे नाव ध्यानीराम पडारे

(c) Date/Year of Birth : जन्म तारीख / वर्ष ३४ वर्ष (d) Nationality : राष्ट्रीयत्व भारतीय

(e) Passport No. : पारपत्र क्र. — Date of Issue : दिल्याची तारीख — Place of Issue दिल्याचे ठिकाण —

(f) Occupation : व्यवसाय शेती

(g) Address : पत्ता रा. सिलेगाव पो. वाहनी ता. तुमसर जि. भंडारा

# फिर्याद

दिनांक:—०४/०९/२०१९

मी श्री. संदीप ग्यानीराम पडारे, वय ३४ वर्षे धंदा—शेती रा. शिलेगाव पो. वाहणी ता. तुमसर, जि. भंडारा

मी दिनांक ३०/०८/२०१९ रोजी पोलीस निरीक्षक श्री. योगेश्वर पारधी, ला. प्र. वि. भंडारा यांचे समक्ष एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने लेखी तक्रार नोंदविली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

''मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर होवून पोलीस निरीक्षक योगेश्वर पारधी यांचे उपस्थितीत लेखी तक्रार नोंदवितो की, मी वरील पत्यावर राहतो शेतीचा व्यवसाय करतो. माझे वडील श्री. ग्यानीराम मंगल पडारे यांच्या नावाने महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत गुरांचा गोठा सन २०१८ मध्ये मंजूर झाला होता. मंजुर झालेल्या गोठयाचे बांधकाम जुन २०१९ मध्ये पुर्ण झाले. त्या गोठयासाठी मला तिन टप्प्यात ३६,०००/— रूपये मिळाले. उरलेले ३६,०००/— रूपयाचे बिल काढून देण्यासाठी मी लांजेवार साहेब पंचायत समीती, तुमसर यांना भेटलो असता, त्यांनी मला माझे प्रलंबीत बील तयार करून काढून देण्यासाठी २०००/— रूपये मागीतले. मी पैसे दिले नाही तर बिल निघणार नाही असे म्हटले.

माझे वडिलाचे नावाने महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजुर झालेल्या गुरांच्या गोठयाचे ३६,०००/—रूपयाचे प्रलंबीत बिल तयार करून काढुन देण्यासाठी श्री. लांजेवार साहेब यांनी मला मागीतलेले २०००/— रूपये त्यांना देण्याची मुळीच ईच्छा नाही तरी त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता तक्रार देत आहे. मी लाचेकरीता लागणारे २,०००/— रू. सोबत आणले आहेत.

श्री. लांजेवार साहेब पंचायत समिती, तुमसर यांचेशी पुर्वीचे माझे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. तरी त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यास विनंती आहे. अशी लेखी तक्रार नोंदविली.

पोलीस निरीक्षक श्री. पारधी, यांनी लाचेच्या संबंधाने सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी दोन शासकीय पंचाना बोलावून घेवून त्यांना मी दिलेली लेखी तक्रार वाचण्याकरीता दिली व त्याचेवर सहया केल्या. नंतर मी माझेकडील २०००/—रूपये त्यात ५००/—रू. दराच्या ४ चलनी नोटा सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. पारधी साहेब आणि दोन्ही पंचासमक्ष पेश केले. त्यांनी सर्व नोटांवर पावडर लावुन प्रात्यक्षिक करून दाखविले व लाचेची रक्कम त्यांनी आपल्याकडे सुरक्षित ठेवुन घेतली. पंचासमक्ष मला आणि पंचाना तक्रारीची पडताळणी करण्याकरीता सुचना दिल्या. नंतर सापळा अधिकारी पारधी साहेब यांनी मला गै.अ.लांजेवार हे त्यांचे कार्यालयात हजर मिळनार किंवा कसे याबाबत विचारले असता मी त्यांना आज बैल पोळा असल्याने गै.अ. हे आज कार्यालयात हजर मिळणार नाही. तसेच दिनांक ३१/०८/२०१९ ते ०२/०९/२०१९ पर्यंत शासकिय सुट्टया आल्या असल्याने सापळा अधिकारी श्री. पारधी साहेब यांनी गै.अ.लांजेवार यांचे विरूध्द लाचेच्या मागणी संदर्भाने दिनांक ०३/०९/१९ रोजी पडताळणी कार्यवाही करण्याचे

संदीप ग्यानीराम पडारे
दि. ०४/०९/२०१९

**Form : 1-B**

Details of known/ suspected/ unknown accused with full particulars :
माहित असलेल्या/ संशयीत/ माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील :
(Attach separate sheet, if necessary)
(आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा)

No. 0000553

आरोपी श्री. राजु घनश्याम लांजेवार, वय-५३ वर्ष, पद-तांत्रीक पॅनल अधिकारी (कंत्राटी अभियंता) पंचायत समिती, तुमसर रा. माकडेनगर तुमसर, ता. तुमसर जि. भंडारा

Physical features, deformities and other details of the suspect :
संशयितांची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex लिंग | *Date/Year of Birth जन्मतारीख/ वर्ष | *Build बांधा | *Height in Cms. उंची (सें. मी. मध्ये) | *Complexion वर्ण | *Identification Mark(s) ओळख |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| | | | | | |

| *Deformities/Peculiarities व्यंग / वैशिष्ट्ये | *Teeth दात | *Hair केस | *Eye डोळे | *Habit(s) सवयी | *Dress Habits पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| | | | | | |

| * Languages/Dialect भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark भाजल्याची खूण | *Leucoderma कोड | *Mole तीळ | *Scar व्रण | *Tattoo गोंदण |
| (13) | (14) | (15) | (16) | (17) | (18) |
| | | | | | |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I. O.
जर तक्रारदार/ खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.
A database created will subsequently link one suspect in several cases, if any.
या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट करेल.
A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.
वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुनःश्च तयार करावी.

ठरविण्यात आले. दिनांक ०३/०९/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता खापा चौक परीसरात मा... सायकलने हजर राहण्याचे सांगितले.

दि. ०३/०९/१९ रोजी मी माझे दुचाकी वाहनाने खापा चौक परीसरात हजर आलो. सापळा अधिकारी श्री. पारधी साहेब हे दोन्ही पंच व कर्मचारी यांचे सह हजर आले. पंचासमक्ष मला तक्रारीची पडताळणी करण्याकरीता त्याबाबत सुचना समजावुन सांगितल्या. पडताळणी कार्यवाही करीता माझे कडे व्हाईस रेकॉर्डर देवुन पंचासह खापा चौक परिसरातुन श्री. लांजेवार यांचे कडे पंचायत समिती तुमसर येथे पाठविण्यात आले. पडताळणी कार्यवाही दरम्यान गै.अ. श्री. लांजेवार यांनी मला ''माझे वडिलाचे नावाने महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजुर झालेल्या गुरांच्या गोठयाचे ३६,०००/—रूपयाचे प्रलंबीत बिल तयार करून काढुन देण्यासाठी २,०००/— रूपये, लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली. मी पंचासह परत आल्यावर श्री. पारधी साहेब यांनी व्हाईस रेकॉर्डर मधिल संरक्षित संभाषन ऐकुण लाचेची मागणी केली असल्याची शहानिशा केली.

सापळा अधिकारी पारधी साहेब यांनी दोन्ही पंचासमक्ष दिनांक ०४/०९/१९ ला कृषी उत्पन्न बाजार समिती तुमसरच्या समोरील परिसरातुन पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविले. त्याबाबत आम्हास, दोन्ही पंचास व कर्मचा—यांना सुचना समजावुन सांगितल्या.

दिनांक ०४/०९/२०१९ रोजी मी दिलेल्या सुचनेप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समिती तुमसरच्या समोरील परिसरात हजर झालो. सापळा अधिकारी श्री. पारधी साहेब दोन्ही पंच व कर्मचा—यासह तिथे हजर आले व पुढील सापळा कार्यवाही आयोजित करण्यात आली. त्यानंतर सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. पारधी साहेब यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती तुमसरच्या समोरील परिसरातुन पुढील सापळा कार्यवाही करण्यासाठी माझ्या गळयात व्हाईस रेकॉर्डर घालुन पावडर लावलेल्या २०००/— रू. ज्यात ५००/— रूपयाच्या चार नोटांचा समावेश होता, त्या माझ्या फुलपॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात पंच श्री. मोहतुरे यांचे हस्ते ठेवुन श्री. लांजेवार यांचे कार्यालयात पंचायत समिती तुमसर येथे पंच क्र. १ मातकर यांचे सह पाठविले असता श्री. लांजेवार हे कार्यालयात हजर नव्हते त्यामुळे मी आपले मोबाईल वरून गै.अ. लांजेवार यांचे मोबाईलवर फोन करून त्यांचेशी बोलंणी केली असता लांजेवार यांनी घरी असल्याचे सांगुण अर्ध्या तासात कार्यालयात येतो असे सांगितले. अर्धा तास होवुनही लांजेवार हे कार्यालयात हजर झाले नाही त्यामुळे मी पुन्हा माझे मोबाईलवरून त्यांना दोनदा फोन केला असता लांजेवार यांनी माझा फोन उचलला नाही त्यामुळे मी कोणताही ईशारा न करता पंच क्र. १ सोबत कृषी उत्पन्न बाजार समिती तुमसरच्या समोरील परीसरात परत आलो. सापळा अधिकारी श्री. पारधी साहेब हे सुध्दा तिथे हजर आले. त्यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकार्डर काढुण घेवुन पंच क्र. १ चे आवाजात बंद करून घेतले. त्यांनतर मी त्यांना वरील माहीती सांगितली.

वेळ १३.२० वाजता मी फोनवर दुस—याशी बोलत असतांनी श्री. लांजेवार यांचा माझे मोबाईलवर फोन आला असल्याने मी माझे मोबाईलवरून श्री. लांजेवार यांचे मोबाईलवर फोन केला असता त्यांनी मला पंचायत समिती मध्ये मी आलो आहे तु ये असे सांगितले.

त्यानंतर सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. पारधी साहेब यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती तुमसरच्या समोरील परिसरातुन पुढील सापळा कार्यवाही करण्यासाठी माझ्या गळयात व्हाईस रेकॉर्डर घालुन माझ्या फुलपॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात लाच रक्कम सुरक्षित असल्याची खात्री करून श्री. लांजेवार यांचे कडे पंचायत समिती तुमसर येथे पाठविले. गै.अ. लांजेवार हे त्यांचे

2

संदीप ग्यानीराम पडारे
दि ०4/09/2019

(3)

Form : 1-C

Reasons for delay in reporting by the Complainant/Informant :
तक्रारदाराने/ खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे : No. 0000553

तक्रार प्राप्त होताच पडताळणी व सापळा कारवाई पुर्ण करुन [illegible]

9. Particulars of properties stolen/involved (Attach separate sheet, if necessary) :
चोरीस गेलेल्या/ अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा) :

10. *Total value of properties stolen/involved : २,०००/- रु. लाच रक्कम
चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. *Inquest Report/U. D. Case No., if any :
मरणान्वेषण अहवाल/ यु. डी. प्रकरण क्र. जर असल्यास :

12. F. I. R. Contents (Attach separate sheets, if required ):
पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावेत) : प्रकरण अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे नावाने महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या गुरांच्या गोठ्याचे ३६,०००/- रुपयाचे प्रलंबित बिल तयार करुन काढून देण्यासाठी तक्रारदार यांना २०००/- रुपये लाचेची मागणी करुन प्रत्यक्ष सापळा कार्यवाही दरम्यान २०००/- रु. लाचरक्कम स्विकारल्याने वर नमुद कलमान्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

13. Action taken : Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2, registered the case and took up the investigation/directed* .......... Rank .......... to take up the investigation/ Refused investigation/transferred to P. S. .......... on point of jurisdiction.
केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमुद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरुन दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले योगेश्वर पारधी
पदनाम पोलीस निरीक्षक यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला/ तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या मुद्यावर ला.प्र.वि. भंडारा .......... पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.

F. I. R. read over to the Complainant/Informant /admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला प्रत मोफत दिली.

14. Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रदाराची/खबरीची सही/अंगठ्याचा ठसा

Signature of the Office-in-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

*Name : प्रमोद प्रे. विसेन
नाव

*Rank : पोलीस नाईक No. २३२
पदनाम क्रमांक

15. Date & Time of despatch to the court : दि. ०५/०९/२०१९
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ

कार्यालयाचे बाहेर असलेल्या सिमेन्ट खर्चीवर बसुन होते. त्यांनी मला मागणी केलेली लाचेची रक्कम २०००/- रू. श्री. लांजेवार यांनी स्विकारल्यानंतर ठरल्याप्रमाणे इशारा देवून श्री. पारधी साहेब यांना बोलावून घेतले.

श्री. पारधी साहेब यांनी श्री. लांजेवार यांना ओळखुन त्यांनी लाच रक्कम स्विकारून ती त्यांचे शर्टच्या समोरील डावे बाजुच्या खिशात ठेवुन असलेली लाच रक्कम दोन्ही पंचासमक्ष ताब्यात घेवुन त्यावर चमकनारी पावडर दिसत असल्याची शहानिशा निळ्या लाईटचा उजेड टाकुन केली. ती लाच रक्कम पंचायत समिती तुमसर येथील महात्मा गांधी राष्ट्रिय ग्रामिण योजनाचे कक्षात दोन्ही पंचासमक्ष जप्त करण्यात आली. श्री. लांजेवार यांचे अंगातील शर्ट पोलीस स्टेशन तुमसर येथे दोन्ही पंचासमक्ष जप्त करण्यात आले.

श्री. राजु घनश्याम लांजेवार, तांत्रीक पॅनल अधिकारी, (कंत्राटी अभियंता) पंचायत समिती तुमसर यांनी **"माझे वडिलाचे नावाने महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजुर झालेल्या गुरांच्या गोठयाचे ३६,०००/-रूपयाचे प्रलंबीत बिल तयार करून काढुन देण्यासाठी पंच साक्षदारासमक्ष २,०००/- रूपये**, लाचेची मागणी करून आज रोजी स्विकारले. लाच रक्कम पोलीसांनी घटनास्थळी जप्त केली आहे. श्री. राजु घनश्याम लांजेवार, तांत्रीक पॅनल अधिकारी, (कंत्राटी अभियंता) पंचायत समिती तुमसर यांनी लाचेची मागणी करून ती स्विकारल्याने त्यांचे विरूध्द कार्यवाहीस्त:व मी फिर्याद देत आहे.

माझा वरिल फिर्यादी बयाण वाचून पाहीला, ते माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

संदीप ज्ञानीराम पजारे
दि ०५/०९/२०१७